REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 11 | ISSUE - 7 | APRIL - 2022

# ललित साहित्यात कादंबरी वाङमयप्रकाराचे वेगळेपण

**फड संजय बाबुराव**
एम.ए मराठी उ.मा. शिक्षक तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
सेनगांव ता.सेनगांव जि.हिंगोली

**सारांशः**

ललित साहित्याचे तीन मुख्य प्रकार आहेतरू कथा, कविता आणि नाटक. माणसाला फार पूर्वीपासून कथांची आवड आहे. कादंबरी हा कल्पित प्रकार आहे. बाराव्या शतकापासून मराठीत काल्पनिक गद्य साहित्य निर्माण होऊ लागले. एकोणिसाव्या शतकात त्याचे विकसित आणि आधुनिक स्वरूप 'कादंबरी'च्या रूपाने निर्माण झाले. हा इतिहास पाहिला तर मराठी कादंबरीच्या आधुनिक युगाच्या प्रारंभी 'कादंबरी' ही एक विशिष्ट संकल्पना तयार झाल्याचे स्पष्ट होते. त्यानुसार कथानकाची रचना, व्यक्तिचित्रण, वातावरण, भाषा त्यात होती. कथेला सुरुवात, मध्य, शेवट आहे.



**परिचयः**

कादंबरी हा आधुनिक वाङ्मयप्रकार आहे. परंतु त्याची परंपरा कथात्मक साहित्याशी जोडलेली आहे. केवळ इंग्रजी साहित्याच्या संपर्कामुळे 'कादंबरी' हा साहित्यप्रकार मराठीत आला नाही. ष्या काळच्या राजकीय घडामोडींमुळे जर सामाजिक जीवनाची घडी इतकी विस्कटली नसती तर या वाङ्मयाची व कथाप्रकारांची उत्क्रांती झाली असती व तिच्या तंत्राचाही विकास झाला असता. असे सांगून पुढे इंग्रजी आक्रमणापूर्वीपासूनच कादंबरी वाङ्मयाला लागणारी जीवनविषयक निरीक्षणाची सामग्री, एक विशिष्ट वृत्ती व दृष्टिकोण मराठी वाङ्मयात होती असे कुसुमावती देशपांडे यांनी सांगितले आहे. बाराव्या शतकापासून निर्माण होणाऱ्या कथात्मक गद्य साहित्याशी 'कादंबरी' वाङ्मयप्रकाराचे नाते आहे. 'कादंबरी' या आधुनिक साहित्य प्रकाराचे स्थूल रूप प्राचीन मराठी वाङ्मयात दिसते. आधुनिक कालखंडात 'कादंबरी' वाङ्मयप्रकाराला स्वतंत्र अस्तित्व प्राप्त झाले.

कादंबरी हा आधुनिक रचनाप्रकार जरी इंग्रजी साहित्यातून मराठीत आला असला तरी या प्रकाराची मुळे मध्ययुगीन गद्य वाङ्मयात सापडतात. महानुभव वाङ्मय, बखरी इत्यादी. मध्यंतरीच्या राजकीय स्थित्यंतरामुळे मराठी गद्य वाङ्मयाची देशी परंपरा खंडित झाली. या परंपरेशी नाते जुळवण्याचा प्रयत्न 'कोसला'ने केला. अगदी अलिकडे सदानंद देशमुखांच्या 'बारोमास' मध्येही हा प्रयत्न आढळतो. त्यामुळे मध्ययुगीन कथासाहित्याचे आधुनिक व विकसित रूप कादंबरीने आधुनिक व विशेषतः साठोत्तरी काळात धारण केले. त्यात जीवनदर्शन, कथानकरचना, स्वभावरेखाटन, भाषाशैली यांची स्पष्ट जाणीव झालेली दिसते. या विशेषामुळे मध्ययुगीन कथासाहित्याशी कादंबरीचे नाते असले तरी तिच्या आधुनिक रूपात इंग्रजीच्या संपर्कामुळे वेगळेपणा आला. रूपवैविध्य आले. मराठी कादंबरीत कादंबरीविषयीच्या संकल्पना सतत बदलत्या राहिल्या. एकाच गृहीत संकल्पनेत सगळ्याच कादंबऱ्या बसू शकत नाहीत.

कादंबरीसदृश गद्य लिखाण मध्ययुगीन काळात होत होते. पण कादंबरी प्रकाराची व तिच्या स्वरूप वैशिष्ट्याची जाण त्या काळात नव्हती. नरहर कुरुंदकर म्हणतात, ष्स्वभाव रेखन आणि जीवनदर्शन यांच्या विषयी पुरेशी जाणीव होण्यापूर्वीच्या युगात कथा आणि कादंबरी तंत्रदृष्ट्या अपरिपक्व आणि मांडणीच्या दृष्टीने

कथानकप्रधान असते. या कालखंडात गोष्ट म्हणजे छोटी कादंबरी आणि कादंबरी म्हणजे मोठी गोष्ट याहून फारसा फरक लघुकथा व कादंबरीत दाखवता येत नाही. काव्यातील काव्यात्मकता व नाटकातील नाट्यात्मकता यांचा स्पर्श क्वचित कथनात्मक साहित्याला होतो, पण म्हणून काव्यात्मकता किंवा नाट्यात्मकता हे कथनात्मक साहित्याचे व्यवच्छेदक गुण म्हणून सांगता येणार नाहीत. कथनात्मक साहित्यातील 'कादंबरी' या वाङ्मयप्रकाराचे स्वरूप इतर वाङ्मयप्रकारापेक्षा निश्चितच भिन्न आहे. वि. का. राजवाडे यांनी साऱ्याच कथात्मक साहित्याला 'कादंबरी' म्हटले आहे. लहान गोष्टी, अद्‌भूत कथा आणि वस्तुस्थित्यादर्शक कथानके या तीन घटकांनी कादंबरीमय सारस्वत बनलेले आहे असे वि. का राजवाडे म्हणतात. त्यांनी सा—याच कथात्मक साहित्याला कादंबरी अशी संज्ञा वापरली असली तरी ती तितकीशी योग्य नाही. कारण, मग त्यात लघुकथा, दीर्घकथा अशा वाङ्मयप्रकारांचाही समावेश करावा लागेल.

काव्य व नाटक या वाङ्मयप्रकारापेक्षा कादंबरी वाङ्मयप्रकाराचा पट विस्तीर्ण असतो, कादंबरी या कथनात्मक साहित्यप्रकाराच्या जवळपास वावरणाऱ्या लघुकथा, दीर्घकथा या प्रकारांचा आकार, आवाका व अनुभव मर्यादित स्वरूपाचा असतो. त्यात सलग, संपूर्ण व व्यामिश्र जीवनदर्शन घडवणे अशक्य असते. जीवनाचा एखादा कोपराच लघुकथा, दीर्घकथा यांतून चित्रित करणे शक्य असते. मात्र कादंबरीत जीवनाची अनेकविध परिमाणे विस्तीर्ण पटावर चित्रित करणे शक्य असते. कथात्म साहित्यप्रकारात लघुकथा, दीर्घकथा, चरित्र, आत्मचरित्र, कादंबरी असे कितीतरी प्रकार आधुनिक कालखंडात सुरू झाले. हे सारे कथात्म साहित्यप्रकार असले तरी प्रत्येक प्रकाराची स्वतंत्र लक्षणे आहेत. लघुकथा व दीर्घकथा यावर लांबीच्या मर्यादा तर आहेतच, शिवाय त्यातील जीवनानुभव एककेंद्री असतो, व्यामिश्र नसतो. लघुकथेपेक्षा दीर्घकथा लांबीने अधिक असली तरी आशय एककेंद्रीच असतो. चरित्र, आत्मचरित्र या प्रकारांत कल्पिताला वाव नसतो, त्यात सत्य घटनांचे दर्शन अभिप्रेत असते. इतिहासाला बाजूला करून चरित्र, आत्मचरित्र लिहिता येणार नाही आत्मचरित्रात निवेदनशैलीवर मर्यादा येतात. आत्मचरित्रकाराला सर्वसाक्षी निवेदन पध्दती वापरता येत नाही. आत्मचरित्रात लेखकाला 'स्व' पासून दूर जाता येणे शक्य नसते, तसे चरित्रात चरित्रव्यक्तिच्या जीवनापासून दूर जाता येणे शक्य नसते. जीवनातील सत्य अनुभवांचीच कलात्मक रचना आत्मचरित्र, चरित्र या प्रकारात शक्य असते. कादंबरीत निवेदन शैलीच्या वेगवेगळ्या प्रकारांचा (प्रथमपुरूषी, तृतीयपुरूषी, सर्वसाक्षी, पत्र, रोजनिशी, संवाद इ.) अनुभवाच्या आवश्यकतेनुसार सहजपणे वापर करता येतो, नाटकात तर संवादाचाच वापर करावा लागतो. रंगभूमीच्या मर्यादेमुळे निवडक प्रसंगच नाटकात दाखवणे शक्य असते. मात्र कोणत्याही प्रकारचे अनुभवविश्व कादंबरीत चित्रित करणे सहज शक्य असते. कादंबरीत अनुभवविश्चावर जशा मर्यादा नाहीत तशा आविष्कार तंत्रावरही मर्यादा नाहीत, त्यामुळे कादंबरी रचनेची विविध रूपे आपल्याला दिसतात. काव्यातील काव्यात्मकता व नाटकातील नाट्यात्मकता कादंबरीत सहजपणे वापरता येते. अनेक वाङ्मयप्रकार पोटात घेणारा सर्वसमावेशक व व्यापक असा कादंबरी हा वाङ्मयप्रकार आहे. त्यामुळे तिच्या स्वरूपाबद्दल निश्चित भूमिका (सिध्दांत) मांडणे टीकाकारांना शक्य झालेले नाही.

मुळातच कादंबरी हा साहित्य प्रकार विशिष्ट सामाजिक परिस्थितीच्या गरजेतून निर्माण झाला आहे. 'यमुनापर्यटन' कादंबरीच्यामागे ख्रिश्चन धर्माचा प्रसार व हिंदू धर्मातील अनिष्ट पध्दती सांगणे हा हेतू आहे. हरिभाऊंची सामाजिक कादंबरी किंवा १९६० नंतरचा कादंबरीचा प्रवास याकडे पाहिल्यास विशिष्ट सामाजिक गरजेतून कादंबरी पुढे सरकताना दिसते. त्यामुळे कादंबरीचे रूप स्थिर राहू शकले नाही. बदलत्या सामाजिक परिस्थितीबरोबर कादंबरीचे स्वरूपही बदलताना दिसते. याचाच अर्थ कादंबरी व समाज यांचा अतिशय जवळचा संबंध आहे असा होतो. १९२५ नंतर फडकेतंत्राच्या प्रभावाखाली असलेली मराठी कादंबरी ख—या अर्थाने १९६० नंतरच मुक्त झाली आणि सामाजिक स्थितीलाही खऱ्या अर्थाने भिडली. ती सर्वसमावेशक आणि व्यापक बनली.

कादंबरीच्या बदलत्या स्वरूपासंबंधीची भूमिका निश्चित करण्यापूर्वी काही महत्त्वाच्या आधुनिक समीक्षकांनी कादंबरीच्या स्वरूपासंबंधी मांडलेले विचार अभ्यासणे आवश्यक वाटते. बापट व गोडबोले यांच्या मते ष्सत्यसृष्टीच्या आधाराने काल्पनिक प्रतिसृष्टी निर्माण करून, काल्पनिक पात्रांची स्वभावचित्रे व काही अंशी तदवलम्बित जीवित—घटना यांचे गोष्टरूपाने वर्णन करून व कलानंदाची प्राप्ती करवून जीवितातील गुंतागुंतीच्या प्रश्नावर प्रकाश टाकणारा गद्यवाङ्मयविभाग.

कादंबरी हा वाङ्मयप्रकार लवचिक, प्रसरणशील आणि सर्वसमावेशक वाङ्मयप्रकार आहे असे सांगून चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात, 'कादंबरी हा सर्वात अधिक जीवनोन्मुख साहित्यप्रकार आहे आणि त्यामुळे जनजीवनाच्या परिस्थितीचे, त्यात निर्माण होणाऱ्या प्रश्नांचे, समस्यांचे, समाजजीवनाच्या सुख—दुःखाचे, राजकीय

व सामाजिक लाटांचे, धोक्यांचे व वादळांचे आवाहन लेखकाला लेखणी हाती धरायला प्रेरक व उत्तेजक ठरावे हे अगदी स्वाभाविक आहे.'

'कादंबरीचे आदि—अंत असलेले रूप घडविताना, कादंबरीकार ज्या जाणिवांवर लक्ष केंद्रीत करून तिला साकार करणाऱ्या सर्व घटकांची संघटना करतो त्या जाणिवांमुळेच त्याच्या कादंबरीला एकात्म, एकसंध, अर्थपूर्ण असे रूप प्राप्त होते.' असे सांगून कादंबरीच्या स्वरूपाबद्दल उषा हस्तक यांनी पुढीलप्रमाणे विवेचन केले आहे.

कादंबरीचे विश्व निर्माण करण्यामागील त्याची (कादंबरीकाराची) प्रेरणा ही खऱ्या अर्थाने एका अनियंत्रित सत्ताधीशाची नसते, तर संवेदनशील मनाच्या कलावंताची असते. ह्या प्रेरणेतून केलेल्या त्याच्या निर्मितीला वाङ्मयीन परंपरेचा आधार असतो. त्याचप्रमाणे वाङ्मय व्यवहार ज्या भाषेच्या बळावर घडत असतो, त्या भाषेचा ठेवा तिच्या धारणेसाठी आवश्यक ती शक्ती पुरवीत असतो. थोडक्यात, कादंबरीकाराचे अनुभवविश्व, वाङ्मयीन परंपरा आणि भाषा ह्यांच्या अर्थपूर्ण संवादी मेळातून कादंबरीच्या सृजनाची प्रक्रिया घडत असते. ती पूर्ण झाल्यावर, नवनिर्मितीचा प्रत्यय आणून देणारी, कलाविश्वात स्वतंत्र अस्तित्व असलेली 'कादंबरी' पूर्ण रूप धारण करते, म्हणूनच, ह्या अशा कादंबरीचे मूल्यमापन करताना तिच्या घडणीत कोणते घटक सहभागी झालेले आहेत, त्यांच्या परस्पर संबंधातून तिचे एकात्म, एकसंध रूप कशा प्रकारे घडविले गेले आहे आणि अंतिमतः तिची समग्र संघटना कलादृष्ट्या अर्थपूर्ण बनलेली आहे का, ह्याचाच शोध आपण घेत असतो. ह्या शोधाला कोणतेही व्यावहारिक मूल्य नसते. एका वाङ्मयीन कलाकृतीच्या आकलनासाठी हा शोध असतो.

बांदिवडेकर कादंबरी प्रकाराला 'सर्वात अधिक जीवनोन्मुख साहित्यप्रकार' असे मानतात. त्यांनी कादंबरीत जीवनदर्शनाला महत्त्व दिलेले आहे. बापट—गोडबोले यांनीही 'सत्यसृष्टीचा आधार' म्हणजेच जीवनातील सत्य घटनांना / जीवनदर्शनाला कादंबरीत महत्त्वाचे स्थान असल्याचे सूचित केले आहे. नेमाडेनीही 'विशाल सामाजिक आशय' अशा शब्दात जीवन या घटकाचे महत्त्व सूचित केले आहे, शिवाय या जीवनातील सामाजिकता त्यांना महत्त्वाची वाटते. उषा हस्तक यांनी आपल्या श्कादंबरीश या लेखात घटना, व्यक्ती, वातावरण इत्यादी घटकांच्या साहाय्याने मानवी जीवनातील वास्तवतेच्या व्यामिश्र रूपाचे दर्शन कथात्म पध्दतीने कादंबरी घडवित असते असे सांगून कादंबरीकार विशिष्ट जाणिवांमुळेच कादंबरीची समग्र संघटना कलादृष्ट्या अर्थपूर्ण बनवतो असे विवेचन केले आहे. कादंबरीकाराच्या जाणिवा या अर्थातच मानवी जीवनासंदर्भातच त्यांना अपेक्षित असाव्यात. रेने वेलेक आणि ऑस्टिन वॉरन यांनी साहित्य ही एक 'सामाजिक सस्था' मानली असून समाजनिष्ठ साहित्य हा साहित्याचा एक प्रकार मानला आहे.

## निष्कर्ष:

वाङ्मय हे लेखक व वाचक यांच्या सहकार्यावर अवलंबून असते, हे सहकार्य नसेल तर वाङ्मयकृती म्हणजे कागदावर काढलेले फराटे असे होईल. लेखक लिहितो ते वाचकांसाठी, आपण जे लिहिले आहे ते वाचकांनी मनाने जिवंत करावे म्हणून. लेखकाला अभिप्रेत असलेला अर्थ भाषेच्याद्वारा दिला जातो. तो भाषेत देहीभूत झालेला नसतो. लेखकाने जे लिहिले आहे त्याच्या मदतीने वाचकाने तो अर्थ निर्माण करायचा असतो. अशी निर्मिती करणारा वाचक नसेल तर वाङ्मयकृती अस्तित्वात येणार नाही. लेखक वाचकाला एक आवाहन करीत असतो. लेखकाने जे जीवनदर्शन निर्माण केले त्याला वाचकाच्या मदतीशिवाय वस्तुगतता येणार नसल्यामुळे, वाचकाने आपल्याला सहकार्य द्यावे, असे आवाहन लेखक करतो. खरे म्हणजे ते वाचकाच्या स्वातंत्र्यालाच केलेले आवाहन असते, कारण वाचकाने उत्स्फूर्तपणे लेखकाला सहकार्य द्यायचे असते. लेखकाने स्वतःच्या स्वातंत्र्याप्रमाणे वाचकाच्या स्वातंत्र्याचीही जपणूक केली पाहिजे. स्वातंत्र्य हा वाङ्मयाचा पाया असल्यामुळे वाङ्मयनिर्मिती ही एक स्वातंत्र्यावर आधारलेली नैतिक कृती ठरते.

## संदर्भः

1. बापट, प्र. वा. व गोडबोले, ना. वा. मराठी कादंबरी तंत्र आणि विकास, पुणे, व्हीनस प्रकाशन, तिसरी आ., सप्टें. १९७३, पृ. २२५
2. देशपांडे, कुसुमावती. मराठी कादंबरी रू पहिले शतक (१८५० ते १९५०), मुंबई, मुंबई मराठी साहित्य संघ प्रकाशन, दुसरी आ. १९७५, पृ. ६८
3. कुरुंदकर, नरहर. धार आणि काठ, पुणे, देशमुख आणि कंपनी (पब्लिशर्स) प्रा. लि., चौथी आवृत्ती, १९९८, पृ. १

4. राजवाडे, वि. का. कादंबरी, जोशी लक्ष्मणशास्त्री, संपा., राजवाडे लेखसंग्रह, नवी दिल्ली, साहित्य अकादमीतर्फे पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६७, दुसरी आ., पृ. २६६
5. बापट, प्र. वा. व गोडबोले, ना. वा. उ. नि. पृ. ३७ बांदिवडेकर, चंद्रकांत. मराठी कादंबरीचा इतिहास, पुणे, मेहता पब्लिशिंग हाऊस, १९८९,